## सभा इतिवृत्त

मा.अध्यक्षा तथा उपविभागीय अधिकारी महाड विभाग महाड यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र औद्योगिक वसाहत व सावित्री नदी/खाडी प्रदुषणाबाबत स्थानिक पर्यावरण रक्षण व संवर्धन समितीची सभा दिनांक २१/०७/२०१४ रोजी आयोजीत करण्यात आली होती. त्या सभेस खालील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते त्याचे सविस्तर इतिवृत्त खालील प्रमाणे.

| अ.क्र.नं. | अध्यक्ष/सदस्य/स्थानिक सदस्य/सचिव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती सुषमा सातपूते | अध्यक्षा तथा उपविभागीय अधिकारी महाड |
| २ | श्री. संदीप कदम | सदस्य तथा तहसिलदार महाड |
| ३ | श्री.डी.बी.पाटील | सदस्य सचिव उप प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मं.महाड |
| ४ | श्री. एस.आर.पाटील | सदस्य कार्यकारी अभियंता मऔविम महाड |
| ५ | डॉ. सुधीर पटवर्धन | स्थानिक सदस्य |
| ६ | श्री.एच.बी. इंगळे | सदस्य तालूका कृषी अधिकारी प्रतिनिधी महाड |
| ७ | श्री.संजय पाटील | सदस्य, एम.एम.ए. सी.ई.टी.पी. प्रतिनिधी महाड |
| ८ | श्री. सुर्यकांत मा. धयगुडे | सदस्य तालुका आरोग्य अधिकारी प्रतिनिधी |
| ९ | श्री.गजानन पवार | क्षेत्र अधिकारी म.प्र.नि.मं.महाड |
| १० | श्री. अमित लाटे | क्षेत्र अधिकारी म.प्र.नि.मं.महाड |

प्रथम सभेस सदस्य सचिव उप प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मं.महाड, जि.रायगड यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभेस सुरवात करण्यात आली. मागील सभा दि. २७/०५/२०१४ च्या इतिवृत्तांताचा आढावा घेत खालील मुद्दयावर चर्चा करण्यात आली.

| अ.क्र. | विषयाचे नाव | विषयाचे निराकरण व करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | सावित्री नदी/खाडी किनारी असणाऱ्या पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत तपासणे. | प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रतिनिधींच्या म्हणण्यानुसार मागील सभेमध्ये ठरल्या प्रमाणे आरोग्य केंद्राने पाणी नमूने तपासणीसाठी घेतले आहेत. मा. आध्यक्ष यांनी सदरील तपासणी अहवाल समितीस अवगत करण्याबाबत सुचना दिल्या. प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रतिनिधींच्या म्हणण्यानुसार सदरील पाणी स्त्रोत हे पिण्यासाठी वापरले जात नाही. |
| २ | श्री.रा.ऊ.पाटील यांनी उपस्थित केलेला विषयः- महाड नगर परिषद क्षेत्रातील सांडपाणी नदीला मिळून होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी उपाय योजना करावी लागेल. | मा. अध्यक्षा यांनी पुढील सभेसाठी महाड नगरपालिकेच्या मुख्याधिकारी तसेच बिरवाडी ग्रामपंचायत सदस्य यांना बोलवण्याबाबत सांगितले. तसेच म.प्र.नि.मंडळ, महाड यांनी मुख्याधिकारी नगरपालिका महाड व इतर ग्रामपंचायत यांनाप्रदूषणाबाबत पत्र पाठवून तसेच समक्ष चर्चा करुन पुढील सभेपर्यंत कार्यवाही करण्याबाबत सांगितले. |
| ३ | बिरवाडी ग्रामपंचायत हद्दीतील नाल्यावर बंधारा बांधणे | कार्यकारी अभियंता मऔविम महाड यांनी बिरवाडी ग्रामपंचायत हद्दीतील नाल्यावर कायमस्वरुपी कॉक्रीटचा बंधारा बांधणे बाबत प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयास पाठवल्याचे सांगितले परंतु वरिष्ठ कार्यालयाशी केलेल्या चर्चेनूसार सद्यस्थितीत बांधण्यात येत असलेला मातीचा बंधारा ठेवावा व सदरील नाल्यात प्रदुषित पाणी येणार नाही या बाबत काळजी घ्यावी असे सुचविल्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी सांगितले. |
| ४ | एमआयडीसी येथे हवा प्रदूषण यंत्रणा बसविण्याबाबत. | उप-प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ, महाड यांनी सांगितले की, म.औ. वि.महामंडळ कार्यक्षेत्रात तीन ठिकाणी वातावरणातील हवा गुणवत्ता तपासणी यंत्रणा बसविण्यात आली आहे. सदरील हवा तपासणीचे पृथ्थःकरण अहवाल समितीस सादर करण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| ५ | श्रीहरी केमिकल कंपनी ही कोर्टाच्या आदेशाने पुन्हा चालू करण्यात आली त्यामुळे सी.ई.टी.पी.च्या औद्योगिक सांडपाण्याच्या गुणवत्तेवर काही परिणाम झाला किंवा कसे याबद्दल डॉ.पटवर्धन यांनी विचारणा केली. | म.प्र.नि.मंडळ, महाड कडून सांगण्यात आले की, मे. श्रीहरी केमिकल कंपनीच्या weak stream वर प्रक्रिया करून प्रक्रियायुक्त सांडपाणी CETP मध्ये सोडले जाते व strong stream ची विल्हेवाट लावण्यासाठी spray dryer चे काम चालू आहे.तसेच ETP up gradation चे काम चालू आहे. सदरच्या कंपनीने न्यायालयाने घालुन दिलेल्या मुदतीत टप्पेवार काम पुर्ण केले आहे किंवा नाही याची तपासणी MPCB ने करावी. |
| ६ | प्रदूषण करणाऱ्या कंपन्यावर कार्यवाही करण्याबाबत. | म.प्र.नि.मंडळ महाड यांनी सांगितले की, प्रदूषण करणा-या कंपन्यांवर वेळोवेळी कारवाई चालू असते, परंतु CETP ने प्रत्येक महीन्यामध्ये अति प्रदूषित १० कंपन्यांची नावे म.प्र.नि.मंडळास अध्याप कळवली नाहीत. मा. अध्यक्षा यांनी सदरील कंपन्यांची नावे कळविण्याबाबत CETP ला सांगितले. |
| ७ | सुदर्शन केमिकल कंपनी, अशोक अल्कोकेम, लक्ष्मी ऑरगॅनिक व पिडीलाईट कंपनीचे प्रकिया युक्त सांडपाणी जे CETP ला घेलले जाते ते सांडपाणी घेण्याआगोदर तपासून घेतल्यास तसेच MIDC तील इतर लहान कंपन्याचे औद्योगिक सांडपाणी तपासून घेतल्यास CETP वर ताण पडणार नाही असे म.प्र.नि.मं.यांचे अधिकारी यांनी सूचविले. | म.औ. वि.महामंडळाचे कार्यकारी अभियंता श्री. पाटील साहेब यांनी या संबंधात सांगितले की, ९ ठिकाणी साठवण टाक्यांचे काम पुर्ण झाले असून त्या लवकरच चालू करण्यात येतील. परंतु सद्या पावसाचे पाणी मिसळल्यामुळे सदरील पाण्याचे पृथःकरण करण्याची अवश्यकता नाही असे म.औ. वि.महामंडळाचे कार्यकारी अभियंता श्री. पाटील साहेब यांनी सांगितले. तसेच सुदर्शन केमिकल कंपनीचे domestic सांडपाणी देखिल CETP ला घेण्याबाबतचे काम चालू आसलेबाबत सांगितले. |
| ८ | औद्योगिक सांडपाणी वाहून नेणाऱ्या वाहिनी संबंधातील NIO चा रिपोर्ट काय आहे या संबंधात उपविभागीय अधिकारी यांनी उपस्थित केलेला प्रश्न ? | कार्यकारी अभियंता श्री. पाटील यांनी सांगितले की, काम चालू आहे व ऑक्टोबर महीन्यापर्यंत काम पुर्ण होण्याची शक्यता आहे. |
| ९ | खाडी पट्टयातील गावातील कॅन्सर बांधीत रुग्णाबाबत आरोग्य विभागा कडून सर्व्हेक्षण करणेबाबत. | प्राथमिक आरोग्य केंद्राच्या प्रतिनिधीनी सांगितले की त्यानी केलेल्या २१ गावांच्या सर्वेमध्ये कॅन्सरचे १० रुग्ण आढळून आले. डॉ. पटवर्धन यांनी रुग्णांमध्ये कोणत्या प्रकारचे कॅन्सर आहे याची माहीती घेण्याबाबत सांगितले जेणेकरुन सदरील कॅन्सर कशामुळे झाला या बाबत कळू शकेल. मा. अध्यक्षा यांनी सदरील माहिती घेणेबाबत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अधिका-यांना सांगितले. |
| १० | अतिरीक्त एमआयडीसी मधील MWML कडून उभारण्यात येणाऱ्या घनकचरा प्रकल्पा विषयी | या संबधात डॉ. पटवर्धन यांनी घनकचरा प्रकल्पाबाबतची पार्श्वभुमी सांगितली व ते म्हणाले की या घनकचरा प्रकल्पाची जागा चुकीची आहे तरी येथे हा घनकचरा प्रकल्प होवू नये तसेच त्यांनी महाराष्ट्र जल संवर्धन यांचे पत्र वाचून दाखवले यावर मा. अध्याक्षा यांनी पर्यायी जागा सुचविण्याबाबत डॉ. पटवर्धन यांना सांगितले व कार्यकारी अभियंता श्री. पाटील यांनी सांगितले की, सदरील प्रकल्प MIDC हद्दीच्या बाहेर उभारणे शक्य होणार नाही. तसेच डॉ. पटवर्धन यांना आलेल्या पत्राच्या प्रती MIDC, MPCB, MMA यांना त्यांच्या स्तरावरील कार्यवाही साठी देण्यात आल्या. |
| ११ | MIDC कडून टेमघर नाल्यावर कॉंक्रीट | मुद्दा क्र. ३ प्रमाणे. |

| | | |
|---|---|---|
| | बंधारा बांधण्याबाबत. | |
| १२ | औद्योगिक वसाहतीमधील वृक्षारोपणाबाबत. | CETP चे प्रतिनिधी यांनी संगितले की, CETP ने त्यांच्या परिसरात १०० झाडे लावली आहेत, तसेच डॉ. पटवर्धन यांनी दिलेल्या यादी नुसार ५००० झाडे सामाजिक वनिकरण विभागाकडून मिळवून देण्याबाबत मा. अध्यक्षा यांचेकडे विनंती केली, उद्योगांकडून झाडे लावण्याबाबत काही प्रतिक्रीया आलेली नाही, परंतु लक्ष्मी ऑरगॉनिक कंपनीने ३००० झाडांची लागवड या वर्षी स्व खर्चाने केलेली आहे. मा. अध्यक्षा यांनी उद्योगांनी केलेल्या वृक्षारोपणाबाबत माहिती घेण्यास MMA ला सांगितले तसेच MPCB ला उद्योग परिसरात ३३% जागा हरितपट्टा आहे किंवा नाही याबाबत माहिती घेण्यास सांगितले. |
| १३ | MIDC क्षेत्रातील शिवमंदीरातील तलावा विषयी श्री.पाटील साहेब कार्यकारी अभियंता म.औ. वि.महामंडळ यांनी मुद्दा उपस्थित केला. | CETP चे प्रतिनिधी यांनी सांगितले की तलावातील गाळ काढण्यासाठी CETP ने पंप दिला होता. तसेच तेथिल सुशोभिकरणाचे काम मे. संन्डोज कंपनीने केले आहे. |
| १४ | Corporate social responsibility बद्दल उप विभागीय अधिकारी, महाड यांनी प्रश्न उपस्थित केला. | मा. अध्यक्षा यांनी Corporate social responsibility अंतर्गत होणा-या २% खर्चासंबधीची माहिती MMA यांना मिळविण्यास सांगितली. |
| १५ | स्थानिक पर्यावरण रक्षण व संवर्धन समितीच्या पुर्नरचनेबाबत.. | स्थानिक पर्यावरण रक्षण व संवर्धन समितीच्या पुर्नरचनेचे आदेश दि.०८/०७/२०१४ रोजी च्या पत्रानूसार पारीत करण्यात आलेले आहेत. |
| १६ | MIDC मधील अग्निशमन दल कार्यरत नसल्याचे तहसिलदार साहेब यांनी निदर्शनास आणून दिले. | MIDC मधील अग्निशमन दल हे MMA कडे असून ते आता MMA चालविणार नसून सदर यंत्रणा ही MIDC कडून चालविली जाणार आहे. मा. अध्यक्षा यांनी महाडमधील कोणकोणत्या उद्योगांकडे स्वतःची अग्निशमन सहयत्रणा फोम टेंडरसहीत आहेत या बाबतची माहिती घेण्यास सांगितले. |

सभेमध्ये खालील नवीन मुद्दयांवर चर्चा करण्यात आली.

| अ.क्र. | विषयाचे नाव | विषयाचे निराकरण व करावयाची कार्यवाही |
|---|---|---|
| १ | मागिल १ महिन्यात नदी प्रदुषणाबाबत किती तक्रारी आल्या होत्या व त्यावर कार्यवाही झाली का असा प्रश्न मा. अध्यक्षा यांनी विचारला. | म.प्र.नि. मंडळाचे उप-प्रादेशिक अधिकारी श्री. पाटील यांनी नदी प्रदुषणाबाबत दोन तक्रारी आल्या. एक दादलीची तक्रार व दुसरी चाफे नडगांव येथील. दोन्ही तक्रारी मध्ये पाणी नमुने घेण्यात आलेले आहेत. |

शेवटी अध्यक्षा तथा उपविभागीय अधिकारी महाड विभाग महाड यांनी सभेस उपस्थित राहीलेल्या सर्व सदस्याचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

**(डी.बी. पाटील)**
**सदस्य सचिव, तथा उप-प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि. मंडळ, महाड.**

**(सुषमा सातपूते)**
**अध्यक्षा तथा उपविभागीय अधिकारी,**
**महाड विभाग महाड.**